# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

## शिष्यवृत्ती कक्ष

---

## शैक्षणिक सत्र 2018-19 शिष्यवृत्तीसंदर्भात अभ्यासकेंद्रांसाठी सूचना (19.01.2019)

**स.न.,**

भारत सरकारची राज्य सरकारमार्फत राबविली जाणारी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठासाठी लागू असल्यामुळे यावर्षी शिष्यवृत्तीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. त्यानुसार ब-याच विद्यार्थ्यांनी या पर्यायाची निवड करून कुठलेही शुल्क जमा न करता अथवा काही प्रमाणात शुल्क जमा करून प्रवेश घेतलेला आहे.

अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश घेऊन शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून विद्यापीठाला प्राप्त होणार असून विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देखील शासनाकडून मिळणार आहे. तर काही प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शुल्काचा काही भार शासन उचलणार आहे. मात्र यासाठी विद्यार्थ्याने दि. 31 जानेवारी 2019 पूर्वी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

जे विद्यार्थी शिष्यवृत्ती अर्ज सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करण्यासंदर्भात Whats App व विद्यापीठ संकेतस्थळाच्या माध्यमातून केंद्रांना यापूर्वीच सूचित केलेले आहे.

**ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा पर्याय निवडला आहे मात्र अद्यापपर्यंत Online शिष्यवृत्ती अर्ज सादर केला नाही, असे विद्यार्थी आपल्या संपर्कात असल्यामुळे किंवा आपल्याकडे त्यांचा डाटाबेस असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना तात्काळ संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क जमा करण्याबाबत सूचित करावे.**

ज्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण शुल्क जमा करून प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळविता येणार असून त्यांनी शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यास व शासनाने त्यांची शिष्यवृत्ती मंजूर केल्यास त्यांनी यापूर्वी विद्यापीठाकडे जमा केलेले शुल्क त्यांना विद्यापीठाकडून परत करण्यात येणार आहे. मात्र अशा विद्यार्थ्यांनीही दि. 31 जानेवारी 2019 पूर्वी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

यावर्षी mahadbtmahait हे संकेतस्थळ पहिल्यांदाच सुरू झाल्याने, विद्यार्थी, अभ्यासकेंद्र, विद्यापीठ मुख्यालय व संबंधित विभाग देखील संभ्रमावस्थेत होते. त्यामुळे वरच्या पातळीवरून जशा सूचना येतात त्याप्रमाणे विद्यापीठाकडून वारंवार विद्यार्थी व अभ्यासकेंद्रांना Whats App व विद्यापीठ संकेतस्थळाच्या माध्यमातून वेळोवेळी सूचित केलेले आहे.

कालच्या महत्वपूर्ण मिटींगनंतर शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यासाठी महत्वपूर्ण सूचना मुक्त विद्यापीठाच्या ycmou.ac.in या संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती टॅबमध्ये दिलेल्या आहेत. त्या वाचण्यासाठी कृपया https://www.ycmou.ac.in/media/post_image/57e1ab8fc4a13b932dd52175b11bd888.pdf या लिंकवर क्लिक करा.

ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी शिष्यवृत्ती अर्ज सादर केलेला आहे. अशा विद्यार्थ्यांनी/अभ्यासकेंद्रांनी सर्व मूळ दस्तावेज (Original Documents) च्या स्कॅन प्रती scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर पाठवावयाच्या आहेत. मूळ दस्तावेजांची माहिती पाहण्यासाठी कृपया विद्यापीठ संकेतस्थळावरील शैक्षणिक सत्र 2018-19 मूळ कागदपत्रं अपलोड करण्याबाबत व इतर महत्वाच्या सूचना 18.01.2019 (Click Here) ही सूचना वाचावी.

**Online शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यासाठी मार्गदर्शक सूचना https://www.ycmou.ac.in/media/post_image/57e1ab8fc4a13b932dd52175b11bd888.pdf या लिंकद्वारे आपण वाचू शकता.**

- विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या दस्तावेजांसह केंद्राकडून दिले जाणारे दस्तावेजही अपलोड करावयाचे असून यादीतील सर्वच मूळ दस्तावेजांच्या स्कॅन प्रती विद्यापीठाच्या scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर पाठवायच्या आहेत. याची कृपया आपणही नोंद घ्यावी.
- विद्यार्थ्यांच्या उपस्थिती पत्रकाचा व संपर्कसत्र हजेरीपत्रकाचा नमुना संकेतस्थळावर दिलेला असून हा केवळ नमुना आहे. नमुन्यात दिलेल्या सूचनांनुसार आपल्या लेटरहेडवर प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वतंत्र उपस्थिती प्रमाणपत्र व संपर्कसत्र हजेरीपत्रक तयार करावयाचे असून त्यातील माहिती व विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवून त्यावर केंद्रांची स्वाक्षरी व शिक्क्यासह ते विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत सादर करावयाचे आहे. त्याची स्कॅन प्रत शिष्यवृत्ती कक्षाच्या उपरोक्त मेल आयडीवर पाठवावयाची आहे.
- परिशिष्ट अ (अभ्यासकेंद्रांनी द्यावयाचे बंधपत्र) मध्ये आवश्यक ती माहिती नमूद करून त्यावर केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजकांची स्वाक्षरी व शिक्क्यासह ते विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत सादर करावयाचे आहे. त्याची स्कॅन प्रत शिष्यवृत्ती कक्षाच्या उपरोक्त मेल आयडीवर पाठवावयाची आहे.
- विद्यार्थ्यांनी सोबतच्या यादीतील सर्व मूळ दस्तावेज (Original Documents) अपलोड करून लगेचच हे स्कॅन केलेले Documents scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर पाठवून द्यायचे आहेत.

  आपल्या सुविधेसाठी मंगळवार किंवा बुधवारपासून विद्यापीठ मुख्यालयातील काही सहकारी प्रत्येक विभागीय केंद्रावर येणार आहेत. त्यांच्या दौ-याचा प्रस्तावित कार्यक्रम आपल्या माहितीस्तव देत आहे. आपल्या संबंधित विभागीय केंद्रावर आपण सदर सहका-यांची भेट घेऊन आपल्या केंद्रावर प्राप्त झालेले शिष्यवृत्ती अर्ज सर्व दस्तावेजांसह व स्कॅन प्रतींच्या Soft Copy सह त्यांचेकडे सुपूर्द करावयाचे आहेत.

**सोमवार दि. 22.01.2019 औरंगाबाद व मुंबई विभागीय केंद्र**
**मंगळवार दि. 23.01.2019 नांदेड व पुणे विभागीय केंद्र**
**बुधवार दि. 24.01.2019 अमरावती व कोल्हापूर विभागीय केंद्र**
**गुरूवार दि. 25.01.2019 नागपूर व नाशिक विभागीय केंद्र**

हा दौरा प्रस्तावित आहे, यात एखादा दिवस पुढे मागे होण्याची शक्यता नाकारता येत नाही, मात्र सदर दिनांकापूर्वी आपण शिष्यवृत्ती कक्षातील संबंधित सहका-याशी संपर्क करून आपल्या विभागाच्या भेटीचा दिनांक व वेळेबद्दल आपण प्रत्यक्ष माहिती घ्यावी, ही विनंती.

तसेच शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे अजून प्रबोधन करावे, जेणेकरून आपल्या विभागीय केंद्रावर दौ-यादरम्यान येणा-या विद्यापीठ मुख्यालयातील सहका-याकडे जास्तीत जास्त शिष्यवृत्ती अर्ज सादर करता येतील. असा प्रयत्न करावा.

सदर दौ-यात आपल्या केंद्रावर जमा झालेले शिष्यवृत्ती अर्ज, शुल्काचे धनाकर्ष, विद्यार्थी व केंद्राने द्यावयाच्या दस्तावेजांच्या स्कॅन केलेल्या Soft Copies इ. संबंधित सहका-यांकडे सुपूर्द करून त्यांची पोहोच घ्यावयाची आहे. तसेच आपल्या शिष्यवृत्तीसंदर्भातील काही शंका, सूचना असल्यास त्याही लेखी अथवा तोंडी स्वरुपात संबंधित सहका-यांपुढे मांडायच्या आहेत. जेणेकरून काही शिष्यवृत्तीसंदर्भात आपल्या किंवा विद्यार्थ्यांच्या काही अडचणी असल्यास पुढील शैक्षणिक सत्रात या सूचनांचा सकारात्मक विचार करता येईल.

संबंधित सहकारी संपूर्ण दिवस विभागीय केंद्रावर उपस्थित असल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना / केंद्रांना शिष्यवृत्ती अर्ज Online पद्धतीने सादर करण्यास अडचणी येत आहेत, अशा विद्यार्थी/ केंद्रांनी सर्व मूळ दस्तावेजांच्या स्कॅन प्रती सोबत घेऊन विभागीय केंद्रावर जाऊन संबंधित कर्मचा-यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्यवृत्ती अर्ज सादर करावयाचे आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या शेवटच्या संधीचा लाभ घेता यावा म्हणून हा निर्णय घेण्यात आला असून आपल्याकडून जास्तीत जास्त सहकार्याची अपेक्षा आहे. आपल्या केंद्रावरील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी कृपया सर्वच विद्यार्थ्यांना दूरध्वनी, मेल, Whats App माध्यमातून संपर्क करून सूचित करावे, ही विनंती.

आपणास शिष्यवृत्तीसंदर्भातील कुठल्याही अडचणी असल्यास कृपया शिष्यवृत्ती कक्षाशी (0253) 2230050 / 9403774810 (रविंद्र तायडे, वरिष्ठ सहायक, शिष्यवृत्ती कक्ष) या क्रमांकावर Whatsp App च्या माध्यमातून किंवा scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर मेलच्या माध्यमातून संपर्क साधावा.

विद्यापीठाच्या शिष्यवृत्ती समूहात विभागनिहाय सामील होण्यासाठी कृपया मुक्त विद्यापीठाच्या https://www.ycmou.ac.in या संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती (Scholarship) या टॅबमधील शैक्षणिक सत्र 2018-19 शिष्यवृत्तीसंदर्भातील Whats App Group Link 11.01.2019 (Click Here) ही सूचना वाचावी.

आवश्यक कागदपत्रं अपलोड करण्याबाबत व इतर माहितीसाठी मुक्त विद्यापीठाच्या https://www.ycmou.ac.in या संकेतस्थळावरील शिष्यवृत्ती (Schoalarship) या टॅबमधील शैक्षणिक सत्र 2018-19 मूळ कागदपत्रं अपलोड करण्याबाबत व इतर महत्वाच्या सूचना 18.01.2019 (Click Here) ही सूचना वाचावी. कृपया ही सूचना आपल्या केंद्रावरील दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी, तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संपर्क करूनही Docuements Upload करण्यासंदर्भात सूचना द्यावी, ही विनंती.

शिष्यवृत्ती योजनेचा लाभ आपल्या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपणास शुभेच्छा !

PRAKASH SHANKARRAO ATKARE

Digitally signed by PRAKASH SHANKARRAO ATKARE
Date: 2019.01.19 18:00:57 +05'30'

(स्थळ प्रतीवर मा. संचालकांची स्वाक्षरी आहे)